॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्र पेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव -४२५ ००१

## जाहीर प्रकटन

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष 2019-20 ते 2023-24 या पाच वर्षांसाठी शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेल्या बृहत विकास आराखडयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष 2019-20 या एका वर्षाकरिता अद्ययावत केलेल्या वार्षिक बृहत आराखडा भाग-1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे **शैक्षणिक वर्ष 2019-2020** साठी कबचौउमवि अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी तसेच भाग-2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठाशी संलग्नीत असलेली महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नवीन विषय, नवीन अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, नवीन अतिरिक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ, सेकंड शिफ्ट इत्यादी विस्ताराचे अर्ज तसेच महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रम/तुकडया यांच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार आणि कायम संलग्नीकरण इत्यादिंचे अर्ज **दिनांक 30/09/2018 किंवा तत्पूर्वी** ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी विद्यापीठातर्फे जाहीर आवाहन करण्यांत येत आहे.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विस्तृत स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Homepage वरील R & D या विभागातील Affiliation वर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन **Proposal Guidelines 2019-20** येथे उपलब्ध असून अर्ज भरतेवेळी helpline देण्यांत आलेली आहे. शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय, विद्यापीठाचा अद्ययावत वार्षिक बृहत आराखडा, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक, वेळापत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके त्याचठिकाणी **Important G.R/ Circulars** आणि **Other G.R./Circulas** या Link वर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहेत.

तरी उपरोक्त Link मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार ऑनलाईन प्रणालीव्दारे परिपूर्ण अर्ज भरुन त्याची हार्ड कॉपी आवश्यक तेवढ्या प्रतींत आवश्यक त्या कागदपत्र व शुल्कासह दिनांक 30/09/2018 किंवा तत्पूर्वी संलग्नता विभागात समक्ष सादर करावेत. वार्षिक बृहत आराखड्याशी सुसंगत नसलेला कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अपूर्ण भरलेले, अपूर्ण दस्तऐवज असलेले, साक्षांकीत कागदपत्र नसलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**अटः-** विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष 2019-20 करीता तयार केलेल्या वार्षिक बृहत आराखड्यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) नियुक्त तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशास अधिन राहून पात्र अर्जाचा विचार केला जाईल. यासंदर्भात शासनाकडून जे आदेश/सूचना प्राप्त होतील, त्यानुसार अर्जांवर कार्यवाही करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाणः-जळगांव

दिनांकः- १८.०९.२०१८

**(भ.भा.पाटील)**
**कुलसचिव**